# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त डी विभाग यांचे कार्यालय, जोबनपुत्रा आवार, नानाचौक, ग्रँटरोड (प), मुंबई- 400 007.

क्र.: सआडी/ २६७८ /सअ(परि) पूर्व दिनांक: ०१/०९/२०२६

**स्थळ दरपत्रिका सूचना**

विषय :- गिरगांव चौपाटीवर गणपती विसर्जन २०२६ करिता एन पुरंदरे रोड रस्ते.ए. दुभाजक, वाहतूक बेट व पदपथ यांची किरकोळ दुरूस्ती (उत्तरेकडील बाजूची) करणे.

गिरगांव चौपाटी येथील गणपती विसर्जन सोहळ्यात दरवर्षी वाढणा-या गणेश मुर्तींच्या संख्या, तसेच भाविकांची वाढती गर्दी व मा. उच्च न्यायालयाने पारीत केलेले आदेश व गणेश विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्याकरीता गिरगांव चौपाटीवर गणपती विसर्जन २०२६ करिता एनपुरंदरे रोड .ए. रस्ते दुभाजक, वाहतूक बेट व पदपथ यांची किरकोळ दुरूस्ती (उत्तरेकडील बाजूची)तातडीने करणे आवश्यक आहे.

सदर कामाचा आवाका व त्याकरिता उपलब्ध असलेला कालवधी लक्षात घेता, सदरची कामे पूर्ण करण्यासाठी प्रचलित निविदा प्रक्रियेचे अवलंबन करणे शक्य नसल्याने तसेच सदर कामाची तातडी, महत्व व कमी असलेला कालावधी विचारात घेता व प्रस्तावित काम कालबद्ध वेळेत पूर्ण करावयाचे असल्याने सदरहु कामाकरिता खुल्या बाजार भावाच्या दरानुसार लघुत्तम बजेटरी ऑफरच्या आधारे खालील नमूद कामाकरिता आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांजकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तीन दिवशीय सूचना प्रदर्शित करून सिलबंद दरपत्रिका मागविण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | जॉब |
|---|---|
| गिरगांव चौपाटीवर गणपती विसर्जन २०२६ करिता एन पुरंदरे रोड रस्ते.ए. दुभाजक, वाहतूक बेट व पदपथ यांची किरकोळ दुरूस्ती (उत्तरेकडील बाजूची) करणे. | ०१ |

देय दिनांक ०३/०९/२०२६ व वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

सहाय्यक अभियंता (परि) पूर्व डी विभाग यांच्या कार्यालयात उपरोक्त दिवशी नियत वेळेपर्यंत सिलबंद दरपत्रिका जमा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

-सही-

सहाय्यक अभियंता (परि) डी विभाग